Circular of the University followed by copy of letter by Maharashtra Government regarding the reserved categories to be considered during admission process


सोलापूर विद्यापीठ
सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव
सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
Websitehttp://su.digitaluniversity.ac

SOLAPUR UNIVERSITY
Solapur-Pune National Highway, Kegaon
Solapur-413 255 (Maharashtra)
EPABX :0217-2744763,2744777 Ext-124
Email : bcudsu@gmail.com


दिनांक :- 2 2 JUN 2015

NEW SATARA COLLEGE OF B.C.A. PANDHARPUR

## परिपत्रक

विषय :- विविध विद्याशाखा/विभागांतर्गत विविध विषयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलातील विभाग प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, शैक्षणिक विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेश देणे आवश्यक आहे.

तथापि ब-याच महाविद्यालय व संकुलांकडून शासनाने दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेशाची कार्यवाही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी शासनाने पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार व आदेशानुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | | आरक्षणानुसार टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | S.C. | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | S.T. | ७% |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३% |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २% |
| ७. | इतर मागास वर्ग | OBC | १९% |
| ८. | सर्वसाधारण (खुला) | OPEN | ५०% |

शासन निर्णयानुसार विविध विषयाच्या अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ५० % व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५० % जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र. जीईसी १०००/(१२३/२०००) तांशि-१ दि. १७/०४/२००० नुसार पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३० % जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात, तसेच अपंगासाठी ३% टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

**प्रवेशाची आवश्यक पध्दत पुढीलप्रमाणे -**

१. विशेष मागास प्रवर्ग व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१ दि. ११ जुले, १९९७ नुसार दिलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.
विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

३. शासनाने दिलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील.

४. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

५. रिक्त जागेवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ % जागेवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

Principal
New Satara College of B.C.A
Pandharpur.

NEW SATARA COLLEGE OF B.C.A. PANDHARPUR